अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय,
३०२, वेक फिल्ड हाऊस,३ रामजला, ब्रिटानियारेस्टोरंटजवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट,मुंबई-४००००१.
दुरध्वनीक्र.०२२-२२६९४९८५/८४ Email:ccfmangrove@mahaforest.gov.in /ccfmmumbai@gmail.com

विषय:- कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीच्या ३० व्या बैठकीचे मंजूर इतिवृत्त.
जा.क्र.कक्ष-१/कांदळवन समिती/ ५८ /२०२४-२५
फोर्ट, मुंबई ४०० ००१ दिनांक: ०५.०७.२०२४

प्रति,

१. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
२. मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई.
३. मा. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे/नवी मुंबई.
४. मा. पोलीस अधिक्षक, ठाणे (ग्रा)रायगड/पालघर/रत्नागिरी/सिंधुदुर्ग (पोलीस उप अधिक्षक व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
५. मा. आयुक्त, महानगरपालिका बृहन्मुंबई/ठाणे/कल्याण-डोंबिवली/मिरा-भाईंदर/वसई-विरार/नवी मुंबई /पनवेल/ भिवंडी- निजामपूर/ उल्हासनगर (उपआयुक्त व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
६. मा. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) ठाणे.
७. मा. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर (विभागीय वन अधिकारी व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
८. मा. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA)
९. मा. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (CIDCO)
१०. मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (MHADA)
११. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण (SRA)
१२. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC)
१३. मा. संचालक, पर्यावरण तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र सागर तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA)
१४. मा. जिल्हाधिकारी, मुंबई/ मुंबई उपनगर/ ठाणे/ पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग.
१५. मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे क्षेत्रिय अधिकारी.
१६. उप वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई.
१७. विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई.
१८. नवी मुंबई एन्व्हारमेंट प्रिझर्वेशन सोसायटी.
१९. श्रीमती. हेमा रमाणी, बॉम्बे एन्व्हारमेंट ॲक्श्न ग्रुप.
२०. श्री. स्टॅलिन डी, वनशक्ती (NGO)
२१. महाराष्ट्र मच्छिमार कृती संघ यांचे प्रतिनिधी
२२. संचालक, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (BNHS)
२३. उप मीठ आयुक्त, मीठागरे विभाग, मुंबई (विशेष निमंत्रित)

**संदर्भ** :- १. या कार्यालयाचे पत्र क्र.जा.क्र.कक्ष-१/कांदळवन समिती/११/सन २०२४-२५, दि.१०.०५.२०२४.
२. या कार्यालयाचे पत्र क्र.जा.क्र.कक्ष-१/कांदळवन समिती/२३/सन २०२४-२५, दि.२७.०५.२०२४.

उपरोक्त संदर्भान्वये कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची **३० वी बैठक मंगळवार, दि.२८.०५.२०२४** रोजी **मा. विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष, कोकण विभाग यांचे अध्यक्षतेखाली** घेण्यात आली होती.

सदर बैठकीचे मंजूर इतिवृत्त आपणास माहिती व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. तरी, कृपया अवलोकन होणेस विनंती आहे.

( डॉ.शैलेंद्रकुमार जाधव, भा.व.से)
सदस्य सचिव,
कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती
तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई

सोबत : बैठकीचे इतिवृत्त.

## कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची ३० वी बैठक
## दिनांक २८.०५.२०२४ रोजीचे इतिवृत्त

समितीचे विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष, कोकण विभाग तसेच समितीचे अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा सह-अध्यक्ष, कांदळवन कक्ष यांच्या अध्यक्षतेखाली कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची जिल्हाधिकारी, मुंबई शहर, ओल्ड कस्टम हाऊस, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई येथे ३० वी बैठक पार पडली. समितीच्या सदस्य सचिव यांनी उपस्थितांचे स्वागत केले व मा.अध्यक्ष यांच्या अनुमतीने समितीच्या कामकाजास सुरुवात झाली. सदर बैठकीस खालील नमूद अधिकारी व कर्मचारी व्यक्तीश: अथवा व्हि. सी. द्वारे उपस्थित होते.

| अ.क्र. | नाव | पद | कार्यालय |
|---|---|---|---|
| १. | श्री.पी.वेलरासू, भा.प्र.से. | अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त | विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन यांचे कार्यालय |
| २. | श्री. एस. व्ही. रामाराव, भा.व.से. | सह अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वन संरक्षक | कांदळवन कक्ष, मुंबई |
| ३. | श्री. संजय एल. यादव, भा.प्र.से. | जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे कार्यालय |
| ४. | श्री. राजेंद्र शं. क्षीरसागर, भा.प्र.से. | जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालय |
| ५. | श्री.एम.देवेंदर सिंह (व्ही.सी.द्वारे), भा.प्र.से. | जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे कार्यालय |
| ६. | डॉ.शैलेंद्रकुमार जाधव, भा.व.से. | सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक | कांदळवन कक्ष, मुंबई |
| ७. | श्री.एस.एन.रेड्डी, भा.व.से. | उपवनसंरक्षक | उपवनसंरक्षक, सावंतवाडी यांचे कार्यालय |
| ८. | श्री. विवेक गायकवाड | उप आयुक्त (महसूल) | विभागीय आयुक्तांचे कार्यालय, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई |
| ९. | श्री.दिपक खाडे | विभागीय वन अधिकारी | विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, कुर्ला यांचे कार्यालय |
| १०. | श्री.सुदाम परदेशी | निवासी उपजिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी, ठाणे यांचे कार्यालय |
| ११. | श्री.जयराज कारभारी | निवासी उपजिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी, शहर यांचे कार्यालय |
| १२. | श्री. संजय कुमार समोट | उपअधिक्षक | उपनमक आयुक्त कार्यालय, ट्रॉम्बे |
| १३. | श्री.जितेंद्र जगदाळे | सहाय्यक पोलीस आयुक्त | पोलीस आयुक्तालय, ठाणे |
| १४. | श्री.प्रशांत रोडे | अतिरिक्त आयुक्त | ठाणे, महानगरपालिका |
| १५. | श्री.धनाजीराव धायगुडे | अधीक्षक, नगरभूमापक व भूमि अभिलेख | जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे कार्यालय |

| | | | |
|---|---|---|---|
| १६. | श्री.उर्मिला पाटील | उपविभागीय अधिकारी | पनवेल, जि.रायगड |
| १७. | श्री.भागवत गावंडे | उपविभागीय अधिकारी | मुंबई शहर (पश्चिम) |
| १८. | श्री.प्रकाश संकपाळ | उपविभागीय अधिकारी | मुंबई उपनगर (पूर्व) |
| १९. | श्री.चंद्रकांत भगत | कार्यकारी अभियंता | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी, मुंबई |
| २०. | श्रीमती विद्या सावंत | उपपर्यावरण अधिकारी | ठाणे, महानगरपालिका (प्रदूषण नियंत्रण विभाग) |
| २१. | श्री.सागर जाधव | सहाय्यक पोलीस निरीक्षक | सपोआ, नवी मुंबई यांचे कार्यालय |
| २२. | श्री.अरुण भोर | स.पो.आ. (समन्वय) | पोलीस आयुक्तालय कार्यालय, मुंबई शहर |
| २३. | श्री.संतोष कोळी | पोलीस उपनिरीक्षक | विक्रोळी विभाग, विक्रोळी स.पो.आयुक्त कार्यालय |
| २४. | श्री.स्टॅलिन डी. | संचालक, अशासकीय सदस्य | वनशक्ती |
| २५. | श्री.सचिन भालेराव | तहसिलदार (महसूल) | पालघर |
| २६. | श्री.पी.बी.गोफणे | पोलीस उपअधिक्षक | SP ऑफिस, रायगड यांचे कार्यालय |
| २७. | श्री.एस.ए.परब | सहा.आयुक्त | नवी मुंबई महानगरपालिका § परि -१ |
| २८. | डॉ.वैभव विधाते | उपायुक्त | पनवेल, महानगरपालिका |
| २९. | श्रीमती विशाखा मोटखरे | उपआयुक्त | वसई विरार महानगरपालिका यांचे कार्यालय |
| ३०. | श्री.अजय वानखेडे | उप नियोनकार | सिडको, नवी मुंबई |
| ३१. | श्री.जगदीश पाटील | वरिष्ठ नियोजनकार | सिडको, नवी मुंबई |
| ३२. | श्रीमती. हेमा रमाणी | बी.ई.ए.जी. | बॉम्बे एन्व्हारमेंट ॲक्शन ग्रुप |
| ३३. | उप विभागीय अधिकारी, कणकवली | प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | |
| ३४. | उप विभागीय अधिकारी, कुडाळ | प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | |
| ३५. | पोलीस अधिक्षक, पालघर | प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | |
| ३६. | पोलीस अधिक्षक, रत्नागिरी | प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | |
| ३७. | उप निबंधक अधिकारी (S.R.O) चिपळूण | प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | |
| ३८. | श्रीमती रेशमा पिटाले | प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | |
| ३९. | तहसिलदार,वेंगुर्ला | प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | |
| ४०. | पोलीस अधिक्षक, ठाणे (ग्रामीण) | प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | |
| ४१. | श्री.तन्मय बोरे | प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | वसई विरार महानगरपालिका यांचे कार्यालय |
| ४२. | महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (MPCB) | अनुपस्थित | |

| अ.क्र | विषय | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १ | कांदळवन क्षेत्र वन विभागास हस्तांतरीत करणेबाबत चर्चा. | • सदर विषयाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका ८७/२००६ अन्वये पारित केलेल्या कांदळवन क्षेत्राच्या हस्तांतरणांच्या आदेशांबाबत समितीचे सह-अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई यांनी सर्व उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच कांदळवन कक्ष, मुंबई कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या माहितीनुसार जिल्हानिहाय / शासकीय विभागनिहाय (महसूल तसेच इतर विभाग) संबंधित विभागाच्या अधिपत्याखाली खाली नमुद केलेले कांदळवन क्षेत्र वन विभागास हस्तांतरीत करण्यासाठी प्रलंबित असल्याचे सांगितले. |

| अ.क्र. | जिल्हा | शासकीय विभाग | क्षेत्र (हेक्टर) | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | सिंधुदूर्ग | महसूल | ५८.१० | या संदर्भात निवासी उपजिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांनी सिंधुदूर्ग जिल्ह्यातील एकूण ५८.१० हेक्टर क्षेत्रापैकी मौजे म्हारतळे, ता.वेंगुर्ला येथील शासकीय जमिनीवरील कांदळवन क्षेत्राची एकूण ८.२४ हेक्टर क्षेत्राची ड्रोनव्दारे मोजणीची कार्यवाही पूर्ण करुन सदरचे क्षेत्र वन विभाग, सावंतवाडी यांचे ताब्यात देण्यात आले असल्याचे सांगितले. तसेच, उर्वरित क्षेत्राची (४९.८५ हेक्टर) मोजणी करुन वन विभाग, सावंतवाडी यांचे ताब्यात समितीच्या पुढील बैठकीपूर्वी देण्याबाबत संबंधित उपविभागीय अधिकारी यांना सूचना देण्यात आले असल्याचे सांगितले आहे. |
| २ | रत्नागिरी | महसूल | ५७९.०१ | सदर क्षेत्राबाबत जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी एकूण ५७९.०१ हेक्टर क्षेत्राची मोजणी पूर्ण झालेली असून सदर क्षेत्र वन विभागास हस्तांतरण करण्याची प्रक्रिया अंतिम टप्यात असून ही प्रक्रिया समितीच्या पुढील बैठकीपूर्वी पूर्ण केली जाईल असे सांगितले. |
| ३ | पालघर | महसूल | १२७७.५८ | या संदर्भात निवासी उपजिल्हाधिकारी, पालघर यांनी कांदळवन क्षेत्र हस्तांतरणाबाबत मोजणीची प्रक्रिया सुरु आहे. लोकसभा निवडणूकीच्या कार्यक्रमामुळे सदर मोजणी प्रक्रिया संथगतीने सुरु असून समितीच्या पुढील बैठकीपूर्वी कांदळवन क्षेत्र वन विभागाकडे हस्तांतरण करण्यात येईल असे सांगितले. |
| ४ | रायगड | JNPA | ७०.३३ | या संदर्भात मा.सह-अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी रायगड जिल्ह्यातील JNPA कडील ७०.३३ हेक्टर क्षेत्र हस्तांतरीत करणे बाकी असून याबाबत JNPA यांनी त्यांचे स्तरावरून केंद्र सरकार (GOI) कडून संमती (Consent) घेवून सदरहू क्षेत्र कांदळवन विभागास हस्तांतरीत करणेबाबत तात्काळ कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल समितीच्या पुढील बैठकीपूर्वी करणेत यावे असे निर्देश दिले. |
| ५ | ठाणे | महसूल | २.६९ | सदर क्षेत्रावर अतिक्रमण झाले असल्याचे उपस्थित प्रतिनिधींनी सांगितले. याबाबत, जिल्हाधिकारी, ठाणे यांनी बैठकीत घेऊन त्याबाबतचा सविस्तर अहवाल समितीच्या पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याबाबत मा.सह-अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक निर्देश दिले. |
| ६ | मुंबई शहर | महसूल | २३.६५ | या संदर्भात सदर क्षेत्र केंद्र शासनाच्या अंतर्गत सॉल्ट पॅन विभागाच्या ताब्यात असल्याचे मा.सह-अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी सांगितले तसेच, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानूसार सदर क्षेत्र हस्तांतरण करण्याचे अनिवार्य असून याबाबत, जिल्हाधिकारी, मुंबई शहर व सॉल्ट पॅन विभागाने त्याबाबत कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल समितीच्या पुढील बैठकीपूर्वी देण्याबाबत निर्देश दिले. |
| | | एकूण | २०११.३६ | |

<table>
<tr>
<td>२</td>
<td>कोकण विभागातील सर्व (७) सागर तटीय जिल्ह्यातील समितीकडे Offiline पध्दतीने प्राप्त झालेल्या तक्रारींचा निपटारा करणेबाबत चर्चा.</td>
<td>दि.१५.०३.२०२४ पर्यंत कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीसमोर आलेल्या ऑफलाईन तक्रारीबद्दल झालेल्या चर्चेनुसार एकूण ९६ तक्रारी प्राप्त आहेत. याबाबत, मा.अध्यक्षांनी जिल्हानिहाय तक्रारीची संख्यापाहून संबंधित जिल्हाधिकारी यांनी प्रलंबित तक्रारीवर कार्यवाही करणेसंबंधी सूचना दिल्या.
<table>
<tr><th>District</th><th>Total No. of Complaints of 30th Meeting</th></tr>
<tr><td>Mumbai City</td><td>0</td></tr>
<tr><td>Mumbai Suburban</td><td>30</td></tr>
<tr><td>Thane</td><td>40</td></tr>
<tr><td>Palghar</td><td>13</td></tr>
<tr><td>Raigad</td><td>13</td></tr>
<tr><td>Ratnagiri</td><td>0</td></tr>
<tr><td>Sindhudurg</td><td>0</td></tr>
<tr><td>Total</td><td>96</td></tr>
</table>
या तक्त्याप्रमाणे मुंबई उपनगर जिल्ह्यातील १५ तक्रारीबद्दल बैठकीमध्ये चर्चा केल्यानंतर मा.अध्यक्षांनी सदरहू समिती ही विभागीय स्तरावरील सनियंत्रण (Monitoring) करणेसाठी असून या समितीमध्ये प्रत्येक तक्रारनिहाय चर्चा करणे शक्य नसल्याने याबाबत कोकण विभागातील सर्व जिल्हाधिकारी यांनी त्यांचे स्तरावर असणा-या जिल्हास्तरीय कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समित्यांनी त्यांचे अधिनस्त असणा-या सर्व तक्रारीचे अवलोकन करुन तक्रारनिहाय दखल घेवून कांदळवन पुर्नस्थापन (Restoration) करणेसाठी लागणारा कालावधी आणि त्यासंबंधी येणा-या खर्चाचे (Associated Cost) संबंधित महानगरपालिका अथवा इतर स्वायत्ता संस्थाकडून करणेबाबत नियोजन करुन सविस्तर कृती आराखडा (Action Taken Report) तयार करावा व यावर सातत्याने सनियंत्रण करण्यात येवून ते नंतर विभागीय स्तरावरील समितीसमोर पुढील बैठकीपूर्वी सादर करणेबाबत सूचना दिल्या.</td>
</tr>
<tr>
<td>३</td>
<td>Mangorve Suraksha App वर प्राप्त तक्रारींकरिता ॲपवर स्थळपाहणीसाठी तारीख व स्थळपाहणी अहवाल विहित प्रारुपात ॲपवर अपलोड करणे व त्यानुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या संबंधीत चर्चा.</td>
<td>दि.१६.०३.२०२४ पासून Mangrove Suraksha App सुर करणेत आले असून या ॲपवर तक्रारदार Online स्वरुपात तक्रार दाखल करतात व काही तक्रारी अजूनही offiline प्रकारामध्ये प्राप्त होतात त्यादेखील या ॲपवर कांदळवन कक्षा मार्फत Upload केल्या जातात.</td>
</tr>
</table>

दि.२४.०५.२०२४ रोजी Mangrove Suraksha App वर प्राप्त तक्रारीबाबतची सद्यस्थिती खालीलप्रमाणे.

| District | Total Complaint | Open Complaint | Close Complaint | Pending for giving date to site inspection | Pending for uploading site inspection report | Pending for uploading action taken report |
|---|---|---|---|---|---|---|
| Mumbai City | 2 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| Mumbai Suburban | 59 | 59 | 0 | 19 | 59 | 59 |
| Palghar | 10 | 10 | 0 | 10 | 10 | 10 |
| Raigad | 28 | 25 | 3 | 5 | 25 | 25 |
| Ratnagiri | 2 | 1 | 1 | 0 | 1 | 1 |
| Sindhudurg | 6 | 6 | 0 | 6 | 6 | 6 |
| Thane | 53 | 52 | 1 | 3 | 36 | 52 |
| **Total** | **160** | **154** | **6** | **44** | **138** | **154** |

मा.अध्यक्ष यांनी याबाबत असे निर्देश दिले की, ज्या तक्रारीबाबत स्थळपाहणीकरिता तारीख दिल्या नाहीत त्या तातडीने देणेत याव्यात व ज्या तक्रारीचा स्थळपाहणी अहवाल APP वर Upload केल्या नाहीत त्याबद्दल तात्काळ कार्यवाही करावी आणि ज्या तक्रारीबाबत कार्यपूर्ती अहवाल (Action Taken Report) Mangrove Suraksha App वर Upload केलेले नाहीत अशा तक्रारीबाबत संबंधित विभागाने म्हणजेच महसूल किंवा वन विभागाने यावर तात्काळ कार्यवाही करावी. याकरिता, कोकण विभागातील सर्व जिल्हाधिकारी यांनी जिल्हास्तरावरील समितीमध्ये आढावा घेऊन सर्व तक्रारींचा निपटारा करणेसंबंधी कृति आराखडा तयार करुन समितीच्या पुढील बैठकीपूर्वी सादर करावा.

४ मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या सूचना

जिल्हास्तरीय समितीने त्यांच्याकडे प्रलंबित असणाऱ्या तक्रारींवर कोणत्या विभागाने कार्यवाही करावयाची आहे. हे स्पष्ट करुन खालीलप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.

| अ.क्र. | तपशिल | कार्यवाही |
|---|---|---|
| १ | वन जमिन | उप वनसंरक्षक |
| २ | महसूल जमिन | जिल्हाधिकारी |

तसेच तक्रारींचे अवलोकन करुन तक्रारनिहाय दखल घेवून संबंधित तक्रारींचे वर्गीकरण (Broad Classification) करावे. उदा. अतिक्रमण, कांदळवन तोड किंवा डेब्रिज काढणे इत्यादी विचारात घेवून वर्गीकरण करण्यात यावे.

जिल्हास्तरीय समितीने तक्रार निवारण करणेसाठी आवश्यक असणारे कांदळवनाचे पुर्नस्थापन

| | | |
|---|---|---|
| | | (Restoration) करण्यासाठी अंदाजपत्रके तयार करुन त्याकरिता आवश्यक निधीची (Associated Cost) तरतूद जिल्हा नियोजन समिती (DPC) कडून करणेत यावी व या सर्व बाबी समाविष्ट करुन Detailed Action Plan सर्व जिल्हयांनी तयार करुन पुढील बैठकीमध्ये सादर करावा.<br>मा.अध्यक्ष यांनी कांदळवन संरक्षणबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीवरुन पोलीस यंत्रणेमार्फत गुन्हे नोंदविले जातात त्यामध्ये किती गुन्ह्यांमध्ये शिक्षा झालेली आहे (Conviction Rate). या गुन्हाच्या तपासाबाबतची सद्यस्थितीबाबतचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करणेबाबत सूचना दिल्या. |

(एस.व्ही.रामाराव, भा.व.से.)
सह अध्यक्ष,
कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती,
तथा अपर प्रधान मुख्य वन संरक्षक, कांदळवन कक्ष

05/07/17
(श्री.पी.वेलरासू, भा.प्र.से.)
अध्यक्ष,
कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती,
तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग